दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


**आजचे पंचांग**

शनिवार, दि. ६ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, षष्ठी रात्री २-४२ पर्यंत नंतर सप्तमी तिथी, दिवस नक्षत्र-श्रवण सकाळी ६-०३ पर्यंत नंतर धनिष्ठा
चंद्र रास - मकर संध्याकाळी ७-०४ पर्यंत नंतर कुंभ, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

**भारताकडून गैरफायदा**

**नवी दिल्ली :** भारताने अनेक वर्षे अमेरिकेच्या व्यापार धोरणांचा फायदा घेतला आहे, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केला. "त्यांनी आमच्या कंपन्यांवर प्रचंड कर आकारला आणि आम्ही त्यांच्यावर कोणतेच शुल्क लागू केले नाही," असे ट्रम्प पत्रकारांशी बोलताना म्हणाले. व्यापार करारासाठी भारताबरोबर दीर्घकाळ वाटाघाटी सुरू आहेत याबद्दल प्रश्न विचारला असता त्यांनी भारतावर आयातशुल्क आकारण्याच्या निर्णयाचे समर्थन केले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ०६ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### केरळमध्ये मुसळधार पावसाची नोंद

**तिरुवनंतपुरम :** केरळच्या अनेक भागात शुक्रवारी मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहत आहेत आणि अनेक झाडांच्या फांद्या कोसळल्या, ज्यामुळे वाहने आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. आयएमडीने दिवसासाठी राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला. मलप्पुरम, कोझिकोड, वायनाड, कन्नूर आणि कासारगोड या पाच जिल्ह्यांमध्ये आणि रविवारी मलप्पुरम, कोझिकोड आणि वायनाड या तीन जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी केला आहे.

### संयुक्त राष्ट्राच्या दल हल्ल्याचा निषेध

**नवी दिल्ली :** लेबेनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या अंतरिम दलावर (यूएनआयएफआयएल) झालेल्या हल्ल्याचा भारताने निषेध केला आहे, ज्यात सर्बियाच्या शांती सैनिकाचा मृत्यू झाला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी लेबेनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या पीकीपिंग फोर्सला भारत देत असल्याने या हल्ल्याबद्दल भारत चिंतित आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना आपल्या साप्ताहिक पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

### अमेरिकेतून १०७६ भारतीय हद्दपार

**नवी दिल्ली :** उत्तर नवी दिल्ली या वर्षी आतापर्यंत १०७६ भारतीय नागरिकांना अमेरिकेतून परत आणण्यात आले आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी दिली. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, गेल्या वर्षी ३५६७ भारतीयांना हद्दपार करण्यात आले. या वर्षात आतापर्यंत १०७६ भारतीयांना अमेरिकेतून भारतात परत आणण्यात आले आहे. २०२५ मध्ये, ३,५६७ लोकांना हद्दपार करण्यात आले होते.

१५.१५ लाख कोटींचे प्रश्नचिन्ह; कॉर्पोरेट क्षेत्रात खळबळ

## राजेश एक्सपोर्ट्सचा एलआयसीला गंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** एकेकाळी अवघ्या १,२०० रुपयांच्या भांडवलावर व्यवसाय सुरू करणारे उद्योगपती राजेश मेहता आणि त्यांची कंपनी राजेश एक्सपोर्ट्स आज देशातील सर्वात मोठ्या आर्थिक वादांपैकी एका प्रकरणामुळे चर्चेत आली आहे. भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने (सेबी) कंपनीवर तब्बल १५.१५ लाख कोटी रुपयांच्या महसूल फुगवट्याचा आरोप केल्यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

खासगी क्षेत्रातील कोणत्याही प्रमुख विमा कंपनीने राजेश एक्सपोर्ट्समध्ये गुंतवणूक केलेली नसताना, सरकारी मालकीची भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) ही कंपनीतील एकमेव मोठी देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार म्हणून कायम राहिली आहे. विशेष म्हणजे, एलआयसीचा कंपनीतील हिस्सा मार्च २०१६ मधील १.९९ टक्क्यांवरून वाढत मार्च २०२२ मध्ये ११.२२ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. त्यानंतरच्या काळात या हिस्सेदारीत किंचित घट झाली असून ३१ मार्च २०२६ रोजी ती १०.८ टक्क्यांवर नोंदविण्यात आली. राजेश एक्सपोर्ट्सवरील सेबीच्या कारवाईनंतर एलआयसीच्या या गुंतवणुकीकडेही बाजाराचे विशेष लक्ष लागले आहे.

सोने आणि मौल्यवान धातूंच्या व्यापारातून उभी राहिलेली राजेश एक्सपोर्ट्स ही कंपनी अनेक वर्षे भारतातील सर्वाधिक उलाढाल करणाऱ्या कंपन्यांमध्ये गणली जात होती. कंपनीची वार्षिक उलाढाल लाखो कोटी रुपयांच्या घरात पोहोचली होती. मात्र, एवढ्या प्रचंड महसुलाच्या तुलनेत नफा अत्यंत कमी असल्याने बाजार विश्लेषक आणि गुंतवणूकदारांमध्ये अनेक वर्षांपासून प्रश्न उपस्थित होत होते.

सेबीच्या अंतरिम आदेशानुसार, कंपनीने २०२० ते २०२५ या कालावधीत स्वित्झर्लंडस्थित उपकंपनी व्हॅलकॅम्बीच्या महसुलासंदर्भात चुकीचे आकडे सादर केल्याचा आरोप आहे. तपासात महसूल ९७ ते ९९ टक्क्यांपर्यंत फुगवून दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. याच कारणामुळे सेबीने कंपनी आणि प्रवर्तक राजेश मेहता यांच्यावर निर्बंध लादले असून नव्या फॉरेन्सिक तपासाचे आदेश दिले आहेत.

तपासादरम्यान आणखी काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. काही व्यवहारांबाबत पुरेशी कागदपत्रे उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कथित व्यवहार आणि महसूल आकडेवारीची पडताळणी करताना तपास संस्थांना अडचणी आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घडामोडींनंतर कंपनीच्या समभागांवर मोठा दबाव निर्माण झाला. राजेश एक्सपोर्ट्सने सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. कंपनीच्या मते, महसूल आकडेवारीबाबत गैरसमज निर्माण झाला असून जाहीर केलेले सर्व आकडे अचूक आहेत. सेबीचा आदेश अंतरिम स्वरूपाचा असून अंतिम सुनावणीनंतर वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असा दावा कंपनीने केला आहे.

## रिझर्व्ह बँकेकडून रेपो रेट दर कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्ज घेतलेल्या लाखो नागरिकांसाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या जून महिन्याच्या पतधोरण आढाव्यात भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सध्या रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम राहणार असून कर्जाच्या व्याजदरात कपातीची अपेक्षा असलेल्या कर्जदारांना दिलासा मिळालेला नाही.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी सकाळी पतधोरण समितीच्या बैठकीतील निर्णय जाहीर केला. महागाईची स्थिती, जागतिक आर्थिक घडामोडी, कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आणि वाढती भू-राजकीय अनिश्चितता लक्षात घेऊन समितीने व्याजदर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रेपो दर हा रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना अल्पकालीन कर्ज देताना आकारत असलेला व्याजदर असतो. बँकांना निधीची आवश्यकता भासल्यास त्या सरकारी रोखे तारण ठेवून आरबीआयकडून कर्ज घेतात. रेपो दर कमी झाल्यास बँकांचा निधी उभारण्याचा खर्च घटतो आणि त्याचा फायदा ग्राहकांना कमी व्याजदराच्या स्वरूपात मिळू शकतो. परिणामी गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाच्या ईएमआयमध्ये घट होण्याची शक्यता निर्माण होते. महागाई नियंत्रणासाठी रेपो दर हे रिझर्व्ह बँकेचे महत्त्वाचे धोरणात्मक साधन मानले जाते. महागाई वाढल्यास बाजारातील पैशांचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी व्याजदर वाढविले जातात.

## पुतिन यांची भारताला 'सुखोई-५७'ची ऑफर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मॉस्को :** रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी भारताला पाचव्या पिढीचे अत्याधुनिक लढाऊ विमान सुखोई-५७ पुन्हा एकदा देऊ करताना त्याच्या सहउत्पादनासाठीही रशिया तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रस्तावामुळे भारत-रशिया संरक्षण सहकार्याला नवे बळ मिळू शकते, असे मानले जात आहे.

जागतिक वृत्तसंस्थांच्या पत्रकारांशी संवाद साधताना पुतिन यांनी भारतासोबतच्या दीर्घकालीन सामरिक भागीदारीचा उल्लेख केला. या संवादात 'पीटीआय'चे विजय जोशी हे एकमेव भारतीय पत्रकार उपस्थित होते. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पुतिन म्हणाले की, सुखोई-५७ विमानांचे उत्पादन भारतात संयुक्तपणे करण्यास रशियाची तयारी आहे.

रशिया हा भारताचा पारंपरिक संरक्षण भागीदार राहिला असून भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांमध्ये मोठ्या प्रमाणावर रशियन बनावटीची शस्त्रसामग्री वापरली जाते.

भारत स्वतःचे पाचव्या पिढीचे अत्याधुनिक लढाऊ विमान विकसित करण्यासाठी 'अॅडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट' महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. मात्र, या विमानाच्या निर्मितीला अजून काही वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर रशियाने सुखोई-५७ची ऑफर पुन्हा दिली आहे.

ओबीसींच्या सर्व प्रमुख सवलती आता लागू

## मराठा समाजाला शैक्षणिक दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मराठा समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीसाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शैक्षणिक सवलती आणि योजनांचा लाभ आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही मिळणार आहे. राज्य सरकारने यासंदर्भातील निर्णय जाहीर केला असून, त्यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून मराठा समाजासाठी आरक्षण, शैक्षणिक सवलती आणि आर्थिक सहाय्याच्या मागणीसाठी विविध स्तरांवर आंदोलने सुरू होती. विशेषतः मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनानंतर मराठा समाजाच्या शैक्षणिक प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले गेले होते. या पार्श्वभूमीवर सरकारने ओबीसी धर्तीवरील शैक्षणिक योजनांचा विस्तार मराठा समाजापर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक मदत मिळाल्याने शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

रोजगाराभिमुख शिक्षणाला चालना देण्यासाठी मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना मराठा समाजातील युवकांसाठी खुली करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामुळे युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती योजना देखील मराठा विद्यार्थ्यांना लागू करण्यात आली आहे. यामुळे शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरच विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित विविध खर्चांची प्रतिपूर्ती करण्यासाठी असलेल्या योजनांचाही लाभ मराठा समाजाला मिळणार आहे. शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच इतर शैक्षणिक खर्चांसाठी शासनाकडून आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्यामुळे व्यावसायिक आणि उच्च शिक्षणाचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्रातील रहिवासी असून परराज्यातील अनुदानित अथवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या योजनांचा लाभ मिळणार आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होईल.

ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या सर्व अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सवलती मिळतात, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र ठरणार आहेत. यामुळे विविध व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण क्षेत्रांमध्ये मराठा विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्याची अपेक्षा आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या सवलती लागू राहतील. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्यांना शासकीय लाभांपासून वंचित राहावे लागणार नाही.

अंतर्गत मतभेद उघड; राजकीय कोंडी

## उमेदवारी माघारीवरून मविआत बिघाडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी झालेल्या नाट्यमय घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर आले आहेत. या घडामोडींमुळे महाविकास आघाडीची मोठी राजकीय कोंडी झाली असून घटक पक्षांमधील नाराजीही चव्हाट्यावर आली आहे. पुणे काँग्रेसमधील काही नेत्यांनी तर महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा प्रस्ताव पक्षश्रेष्ठींकडे पाठवल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, उमेदवारांच्या माघारीवरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गंभीर आरोप करत महायुतीवर १५० कोटी रुपयांच्या घोडेबाजाराचा आरोप केला. पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि कोकणातील काही उमेदवारांना माघारीसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक प्रलोभने देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

कोकणातील एका उमेदवाराला माघारीसाठी २५ कोटी रुपये देण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला. मात्र, महायुतीच्या नेत्यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. मंत्री संजय शिरसाट यांनी राऊत यांच्या आरोपांची खिल्ली उडवत, एवढी माहिती असल्यास त्यांनी पोलिसांकडे तक्रार का केली नाही, असा सवाल उपस्थित केला. महाविकास आघाडीकडे पुरेसे संख्याबळ नसल्यामुळेच उमेदवारांनी माघार घेतली असून आता पराभव झाकण्यासाठी आर्थिक व्यवहारांचे आरोप केले जात असल्याचे त्यांनी म्हटले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही उमेदवारांनी वास्तववादी भूमिका घेत संख्याबळाचे गणित लक्षात घेऊन निर्णय घेतल्याचे सांगितले.

पुणे मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी माघार घेतल्याने काँग्रेस आणि ठाकरे गटात नाराजी वाढली आहे.

सोलापूरमध्येही शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारीवरून वाद निर्माण झाला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर टीका करत स्वतःच्या पक्षातील नेते आणि कार्यकर्ते सांभाळण्यात अपयश आल्यामुळे महायुतीवर आरोप केले जात असल्याचे म्हटले. कोणत्याही उमेदवारावर दबाव टाकण्यात आल्याचा एकही पुरावा विरोधकांकडे नसल्याचा दावा त्यांनी केला.

### नोटाबंदीनंतर ६ कोटींच्या नोटा जाळल्या

**तिरुवनंतपुरम :** केरळ लॉटरी वेल्फेअर फंड घोटाळा प्रकरणात मुख्य आरोपीने तपास यंत्रणांना सांगितले की, २०१६ च्या नोटाबंदीच्या मोहिमेमुळे त्याने ६ कोटी रुपयांच्या चलनी नोटा जाळल्या. केरळ लॉटरी वेल्फेअर फंड बोर्डाकडून सुमारे १४ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप असलेला लिपिक संजीत या कारकुनाने शुक्रवारी दक्षता अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत खुलासा केला. या रोखीत ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा होत्या, ज्या नोटाबंदीपूर्वी कल्याणकारी निधीच्या खात्यातून रोखीने काढण्यात आल्या होत्या. या बातमीने मोठी खळबळ उडाली आहे.

## मान्सून महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर

गोव्यात आगमन, तळकोकणात दमदार हजेरीची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पणजी :** नैऋत्य मान्सूनने गोव्यातील काही भागांमध्ये प्रवेश केला असून आता तो महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला आहे. त्यामुळे तळकोकणात मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता असून पुढील काही दिवसांत राज्यात पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, गुरुवारी केरळमध्ये दाखल झाल्यानंतर मान्सूनने उत्तरेकडे वेगाने कूच केली आहे. शुक्रवारी तो गोव्यातील काही भागांपर्यंत पोहोचला.

उपग्रह चित्रांमध्ये केरळ किनारपट्टी, कर्नाटक आणि गोव्याच्या किनारी भागांवर दाट ढगांचे आच्छादन दिसून आले. यावरून मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दुपारनंतर मान्सूनने कर्नाटक, तामिळनाडू तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागरातील आणखी काही भाग व्यापले. त्याचबरोबर अरबी समुद्राच्या आणखी काही भागांमध्ये आणि गोव्यातही मान्सून सक्रिय झाला आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मध्य अरबी समुद्र, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा, तामिळनाडू तसेच ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी वातावरण अनुकूल असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

गोव्यात मान्सून दाखल झाल्यानंतर त्याचा पुढील टप्पा तळकोकण असतो. त्यामुळे सिंधुदुर्ग, रत्नागिरीसह तळकोकणातील भागांत लवकरच पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. कोल्हापूर, सातारा आणि घाटमाथ्यावरील भागांमध्येही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

पालकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता

## इंग्रजी शाळांच्या मनमानी शुल्कावर नियंत्रणाचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना राज्यातील लाखो पालकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून आकारल्या जाणाऱ्या अवास्तव शुल्कावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकार नवीन नियमावली तयार करत असून त्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. त्यामुळे शाळांच्या मनमानी शुल्कवाढीला आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



महागाई, वाढते घरगुती खर्च आणि अलीकडेच वाढलेल्या शालेय बस शुल्कामुळे पालकांवर आर्थिक ताण वाढला आहे. या पार्श्वभूमीवर शाळांच्या शुल्क संरचनेत पारदर्शकता आणण्यावर सरकारचा भर असल्याचे संकेत मिळाले आहेत. प्रत्येक शाळेच्या शुल्काची निश्चित मर्यादा असावी, यासाठी नियमावलीत तरतुदी करण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शुल्कवाढीबरोबरच शालेय साहित्य खरेदीसंदर्भातील सक्तीवरही सरकार कारवाईच्या तयारीत आहे. अनेक शाळांकडून पुस्तके, गणवेश आणि इतर साहित्य विशिष्ट दुकानांतूनच खरेदी करण्याची अट घातली जाते. यामुळे पालकांना अधिक खर्च करावा लागतो. या प्रकारांना आळा घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याचा विचार सुरू असून पालकांना कोणत्याही दुकानातून शालेय साहित्य खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देण्याची तयारी सरकारने दर्शविली आहे. प्रस्तावित कायद्यानुसार शाळांकडून विशिष्ट दुकानांची सक्ती केल्यास त्यावर कारवाईची तरतूद असू शकते. त्यामुळे शालेय साहित्याच्या खरेदीत स्पर्धा वाढून पालकांचा आर्थिक भार कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नंदुरबार येथे बोलताना या उपाययोजनांमुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. शाळांच्या शुल्कवाढीबाबत आणि शालेय साहित्य खरेदीतील सक्तीबाबत पालक संघटनांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने सरकार सकारात्मक पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या या हालचालींकडे राज्यातील लाखो पालकांचे लक्ष लागले असून प्रस्तावित नियमावली आणि कायद्याची अंमलबजावणी कधी होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## पुनर्वसन झाल्याशिवाय कारवाई नको : भोईर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** दळवीनगर ते आनंदनगर परिसरातील रेल्वे हद्दीतील रहिवाशांवर प्रस्तावित कारवाई आणि सुरू असलेल्या पुनर्वसन प्रक्रियेबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. नागरिकांचे पुनर्वसन आणि त्यांचे हक्क सुरक्षित केल्याशिवाय कारवाई करू नये, अशी मागणी त्यांनी केली.

महानगरपालिका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना भोईर म्हणाले की, दळवीनगर ते आनंदनगर परिसरातील रेल्वेलगतच्या झोपडपट्टी भागात राहणाऱ्या नागरिकांना जागा खाली करण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या असून ६ जून आणि ११ जून रोजी कारवाई होण्याची शक्यता आहे. मात्र या कारवाईपूर्वी तेथील रहिवाशांच्या हिताचे संरक्षण होणे अत्यावश्यक आहे.

त्यांनी सांगितले की, संबंधित परिसरातील अनेक रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) प्रकल्पांतर्गत पात्र ठरविण्यात आले आहे.

जर विकसकांकडून या नागरिकांच्या नावावर लाभ घेतला जात असेल, तर त्या सर्व पात्र कुटुंबांची शहानिशा करून त्यांना पुनर्वसनाच्या सदनिका उपलब्ध करून द्याव्यात. तसेच पुनर्वसनाची व्यवस्था होईपर्यंत संबंधित रहिवाशांना भाडेकरार करून पर्यायी निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## संपादकीय

# अर्थव्यवस्थेवरील मंदीचे मळभ




**यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याच्या शक्यतेने देशाच्या अर्थव्यवस्थेवरील मंदीचे मळभ आता अधिकच गडद केले आहे. या अस्मानी संकटामुळे महागाईचा भडका उडण्याची आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे कायमचे मोडण्याची मोठी आणि गंभीर भीती निर्माण झाली असून, सरकारसमोरील धोरणात्मक व आर्थिक आव्हानांची मालिका अधिक खडतर बनली आहे.**

भारत स्वतःला जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि भविष्यातील 'विश्वगुरू' म्हणून कितीही मिरवत असला, तरी आपले हे सर्व दिमाखदार आर्थिक गणित अखेर वरुणराजाच्या लहरीपणावरच पूर्णपणे अवलंबून असते, हे कटू वास्तव आता पुन्हा एकदा उघडे पडले आहे. यंदा मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडणार असल्याचा जो अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे, त्याने देशाच्या 'मॅक्रो-इकॉनॉमिक' चित्रावर निराशेचे अत्यंत गडद मळभ आणले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा खरा कणा आजही शेती हाच राहिला आहे. निसर्गाच्या या अवकृपेमुळे बाजारातील मागणी, महागाईचे आकडे आणि सरकारच्या तिजोरीचे नियोजन अशा सर्वच आघाड्यांवर अत्यंत मोठे आणि अभूतपूर्व संकट उभे राहिले आहे. या संभाव्य दुष्काळाचा सर्वात पहिला आणि थेट फटका बसेल तो महागाईला. आधीच देशातील अन्नधान्य आणि भाजीपाल्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. त्यात जर पावसाने ओढ दिली, तर खरिपाच्या पेरण्या बुडतील आणि उत्पादनात मोठी घट होईल. तांदूळ, डाळी, तेलबिया आणि कांद्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होऊन त्यांचे भाव गगनाला भिडतील. सामान्य माणसाचे स्वयंपाकघरातील बजेट पूर्णपणे कोलमडून पडेल आणि जनतेमध्ये प्रचंड मोठा असंतोष निर्माण होईल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला (आरबीआय) महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी जो आटापिटा करावा लागत आहे, त्यावर हे अस्मानी संकट म्हणजे अक्षरशः पाणी फेरणारे ठरेल. महागाई आटोक्यात येत नसल्यामुळे 'आरबीआय'ला व्याजदर कमी करता येत नाहीत. परिणामी, उद्योगांना मिळणारे कर्ज महाग राहते आणि खाजगी गुंतवणुकीला मोठी खीळ बसते. महागाईचे मूळ कारण आता मागणीत नसून ते पुरवठ्याच्या अभावात दडले आहे. देशातील 'एफएमसीजी' कंपन्या, दुचाकी आणि ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील उत्पन्नावर अवलंबून असते. पाऊसच पडला नाही तर शेतकऱ्याच्या हातात पैसा कुठून येणार? आणि पैसाच नसेल तर बाजारातील खरेदी आपोआप थांबेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेत रोकडटंचाई निर्माण झाली की त्याचा थेट फटका उत्पादन क्षेत्राला बसतो. शहरी भागातील चकाकणारे मॉल्स आणि शेअर बाजारातील उसळी यांवरून अर्थव्यवस्थेची खरी प्रकृती कधीच मोजता येत नसते, याचे साधे भान आता प्रशासनाला ठेवावे लागेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या बाता मारणारे आपले नेते या वास्तवाकडे पूर्णपणे सोयीस्करपणे पाठ फिरवत असतात. या सर्व भयंकर संकटांचा एकत्रित भार शेवटी सरकारच्या तिजोरीवर आणि अर्थव्यवस्थेच्या वित्तीय तुटीवर थेट पडणार आहे. दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना, सरकारला 'मनरेगा'सारख्या योजनांवर हजारो कोटी रुपयांची जास्तीची उधळपट्टी करावी लागेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी, मोफत धान्य आणि आर्थिक मदतीचे पॅकेज द्यावे लागेल. जो पैसा देशाच्या पायाभूत सुविधांवर, रस्ते आणि धरणांवर खर्च होणे अपेक्षित असते, तोच पैसा निव्वळ अनुदाने आणि खैराती वाटण्यात खर्च होईल. यामुळे देशाची वित्तीय तूट पूर्णपणे नियंत्रणाबाहेर जाईल. 'कॅपिटल एक्सपेंडिचर' कमी झाल्यामुळे दीर्घकालीन विकासाचा वेग प्रचंड मंदावेल. ही चिंतेची बाब आहे. राजकीय हितासाठी अर्थशास्त्राचा बळी देण्याची आपली जुनी आणि अत्यंत घातक अशी सवय या काळात अधिक उफाळून येईल. मोफतच्या खैराती वाटून तात्पुरती मलमपट्टी करता येते, पण त्याने अर्थव्यवस्थेचा मूळ आजार कधीही बरा होत नाही, हे शहाणपण या व्यवस्थेला कोण शिकवणार? आपण पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची स्वप्ने रंगवत असलो, तरी पावसाळ्याच्या लहरीपणाने आपली संपूर्ण व्यवस्था कशी पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळू शकते, हेच यातून सिद्ध होते. 'विश्वगुरू' बनण्याच्या पोकळ वल्गना करण्यापेक्षा आपल्या शेतीला आणि अर्थव्यवस्थेला निसर्गाच्या दुष्टचक्रातून कसे बाहेर काढता येईल, यावर प्रगल्भ चिंतन करण्याची आवश्यकता आहे. सिंचनाच्या शाश्वत सुविधा, हवामान बदलाला तोंड देऊ शकणारे आधुनिक तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीतील अत्यंत आवश्यक सुधारणा, यांवर आपण युद्धपातळीवर काम केले पाहिजे. वरुणराजाच्या कृपेवर अवलंबून राहून कोणतेही राष्ट्र जागतिक महासत्ता बनू शकत नाही, हे साधे आणि कटू वास्तव आपल्या धोरणकर्त्यांनी आता खुल्या मनाने पूर्णपणे स्वीकारले पाहिजे.

# शिवकुमार: काट्यांचा मुकुट आणि वेळेची शर्यत!

**» कर्नाटकात प्रदीर्घ राजकीय संघर्षानंतर अखेर शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची मिळवली आहे. मात्र, कमी वेळेत मोठी प्रशासकीय आव्हाने पेलण्याची ही कठीण शर्यत त्यांना आता जिंकावी लागेल.**



कर्नाटकातील राजकीय साठमारी आणि सत्तासंघर्षाचा एक मोठा अंक पूर्ण झाला असून, डी. के. शिवकुमार यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी केलेली ही तडजोड तत्त्वांचा विजय नसून, ती निव्वळ सत्तेच्या तव्यावर पोळी भाजण्याची सोय आहे. सिद्धरामय्या यांच्यासारख्या मुरब्बी नेत्याला बाजूला सारून शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रे सोपवणे, हा पक्षांतर्गत सत्तासंघर्षाचा तात्पुरता उपाय ठरतो. 'संकटमोचक' अशी प्रतिमा असलेले शिवकुमार हे राजकारणाच्या आखाड्यात चतुर आणि साधनशुचितेची फारशी फिकीर न करणारे नेते मानले जातात. परंतु, पडद्यामागचे राजकारण करणे आणि राज्याचे सर्वोच्च प्रशासकीय पद सांभाळणे, या दोन पूर्णपणे भिन्न बाबी आहेत. आतापर्यंत त्यांनी पक्षासाठी रसद पुरवण्याचे आणि आमदारांना एकत्र बांधण्याचे काम चोख बजावले. पण आता त्यांच्यासमोर संपूर्ण राज्य चालवण्याचे मोठे प्रशासकीय आव्हान उभे असून, त्यासाठी त्यांच्याकडे असलेला वेळ अतिशय मर्यादित आहे.

शिवकुमार यांच्यासमोरील सर्वात मोठे आणि भयंकर आव्हान कोणते असेल, तर ते राज्याची डबघाईला आलेली आर्थिक स्थिती हे आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने सत्तेवर येण्यासाठी ज्या 'पाच गॅरंटी' अर्थात मोफत योजनांची खैरात वाटली होती, त्या योजनांनी राज्याला अक्षरशः दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आणून उभे केले आहे. रस्ते, सिंचन, आरोग्य आणि शिक्षणासारख्या पायाभूत सुविधांसाठी राज्याच्या तिजोरीत आता खडखडाट आहे. कोणत्याही राज्याच्या प्रगतीसाठी भांडवली खर्चाची नितांत आवश्यकता असते, मात्र कर्नाटकात हा खर्च मोफतच्या खैरातीपायी जवळपास शून्यावर आला आहे. अशा या रिकाम्या तिजोरीच्या जोरावर शिवकुमार राज्याचा गाडा कसा हाकणार, हा मोठा प्रश्न आहे. या आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठी कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. पण तसे राजकीय धाडस दाखवण्याची मानसिकता त्यांच्याकडे आहे का? का तेही लोकप्रियतेच्या स्वस्त लाटेवर स्वार होऊन राज्याला अधिक आर्थिक दिवाळखोरीत ढकलणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

या सर्व गोंधळात शिवकुमार यांच्यासाठी सर्वात मोठा शत्रू ठरत आहे तो म्हणजे 'वेळ'. मुख्यमंत्रिपदाची खुर्ची मिळवण्यासाठी त्यांनी जो प्रदीर्घ संघर्ष केला, त्यात बराच मौल्यवान वेळ आधीच वाया गेला आहे. आगामी निवडणुकांना सामोरे जाण्यापूर्वी स्वतःची प्रशासकीय कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी त्यांच्याकडे आता अत्यंत कमी कालावधी उरला आहे. घड्याळाच्या काट्यासोबतची ही शर्यत जिंकणे त्यांना वाटते तितके सोपे नाही. या मर्यादित वेळेत त्यांना बंगळुरूसारख्या जागतिक शहराचे रडतखडत चाललेले प्रश्न सोडवायचे आहेत, ग्रामीण भागातील शेती हाताळायची आहे आणि त्याच वेळी परकीय गुंतवणुकीचा ओघ कायम राखायचा आहे. हे सर्व करण्यासाठी ज्या प्रगल्भ राजकीय दूरदृष्टीची गरज असते, ती त्यांच्याकडे आहे की नाही, याची खरी परीक्षा आता उरलेल्या काळात होणार आहे. निव्वळ राजकीय ताकद आणि आर्थिक रसद यांच्या जोरावर निवडणुका जिंकता येतात, पण राज्याचा शाश्वत विकास साधता येत नाही, हे साधे शहाणपण त्यांना आत्मसात करावे लागेल.

या प्रशासकीय आव्हानांसोबतच पक्षांतर्गत गटबाजीचा मोठा ज्वालामुखी त्यांच्या खुर्चीखाली सतत धगधगत असणार आहे. सिद्धरामय्या यांच्या समर्थकांना शांत ठेवणे आणि त्यांच्या प्रशासकीय वर्चस्वाला धक्का न लावता स्वतःचा दबदबा निर्माण करणे, ही तारेवरची कसरत त्यांना करावी लागणार आहे. अशा वेळी एका खंबीर आणि सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या मुख्यमंत्र्याची राज्याला गरज असते. शिवकुमार यांची आजवरची कार्यपद्धती ही आक्रमक आणि 'माझा शब्द हाच कायदा' या स्वरूपाची राहिली आहे.डी. के. शिवकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा हा नवा आणि बहुप्रतीक्षित प्रवास म्हणजे खऱ्या अर्थाने काट्यांचा मुकुट परिधान करण्यासारखेच आहे. वेळेचा अभाव, रिकामी तिजोरी, पक्षांतर्गत धुसफूस आणि जनतेच्या अपेक्षा, अशा कठीण चक्रव्युहात ते स्वतःला कसे सिद्ध करतात, यावर त्यांचे भविष्य अवलंबून असेल. राजकारणात संधी एकदाच दार ठोठावते, ती साधता आली नाही तर काळ कोणालाही माफ करत नाही. निव्वळ 'संकटमोचक' म्हणून मिरवणे आता पुरेसे नाही, तर एका प्रगल्भ आणि दूरदृष्टी असलेल्या 'राज्यकर्त्याची' भूमिका त्यांना प्रभावीपणे वठवावी लागेल. घड्याळाच्या काट्यासोबतच्या या जीवघेण्या शर्यतीत जर ते अपयशी ठरले, तर इतिहासात त्यांची नोंद एका महत्त्वाकांक्षी पण दुर्दैवी आणि अपयशी नेत्याच्या पलीकडे काहीही होणार नाही, हे निश्चित!

# पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट

## पाऊस लांबल्यास पिंपरी-चिंचवडवर पाणीटंचाईचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मावळ तालुक्यातील पवना धरणातील पाणीसाठा चिंताजनकरीत्या कमी होत असून, प्रचंड उष्णतेमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढल्याने धरणाचे पात्र मोठ्या प्रमाणात उघडे पडले आहे. सध्या धरणात केवळ २३ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिल्याने आगामी काही आठवड्यांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. मान्सूनचे आगमन आणखी लांबल्यास शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसह परिसरातील नगरपालिका, ग्रामपंचायती आणि औद्योगिक वसाहतींना वर्षभर पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. धरणातून सोडण्यात आलेले पाणी रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यातून उचलून महानगरपालिकेच्या अशुद्ध जलउपसा केंद्रात आणले जाते. तेथून दररोज सुमारे ५५० एमएलडी पाणी निगडी-प्राधिकरण येथील सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. शुद्धीकरणानंतर हे पाणी शहरातील लाखो नागरिकांना वितरित केले जाते. याशिवाय आंद्रा पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदीवरील बंधाऱ्यातून दररोज ९० एमएलडी पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. तेथून संबंधित भागांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, यंदा वाढत्या तापमानामुळे धरणांमधील पाणीसाठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. पवना धरणाचे पात्र अनेक ठिकाणी कोरडे पडले असून उंचवटे, दगड, माती आणि गाळ स्पष्टपणे दिसू लागला आहे. धरणातील गाळ काढण्यासाठी काही शेतकरीही या भागात पोहोचत आहेत.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मते, सध्याचा उपलब्ध पाणीसाठा जून महिन्याच्या अखेरपर्यंत पुरेल. मात्र, पावसाळा अपेक्षेपेक्षा उशिरा सुरू झाला किंवा पावसाचे प्रमाण कमी राहिले, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते. शहराला पर्यायी स्रोत म्हणून उपयोगी पडणाऱ्या इतर धरणांतील पाणीसाठाही घटत चालला आहे. मावळ तालुक्यातील आंद्रा धरणात सध्या ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. भामा-आसखेड धरणात ३१ टक्के साठा शिल्लक असून, या प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने पिंपरी-चिंचवड शहराला अपेक्षित अतिरिक्त १६७ एमएलडी पाणी उपलब्ध होऊ शकलेले नाही. तर मुळा नदीला पाणी पुरवणाऱ्या मुळशी धरणात केवळ १९ टक्के साठा उरला आहे.

राज्यातील बहुतांश धरणांमध्ये पाणीसाठा घटल्याची पार्श्वभूमी असताना पिंपरी-चिंचवडसाठी पवना धरणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. त्यामुळे मान्सूनची पुढील वाटचाल, धरणांतील आवक आणि पाण्याच्या वापरावरील नियंत्रण यावर शहराच्या पाणीपुरवठ्याचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, अशी सूचना प्रशासनाकडून करण्यात येत आहे. आगामी काही दिवसांत मान्सून सक्रिय झाल्यास परिस्थिती सुधारू शकते; अन्यथा शहरासमोर पाणी व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

# अनधिकृत दारूअड्डा जमीनदोस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** फुगेवाडीतील विषारी गावठी दारूकांडात १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, पिंपरी-चिंचवड महापालिकेने गुरुवारी फुगेवाडी येथील संजयनगर परिसरातील अनधिकृत दारूअड्ड्यावर बुलडोझर चालवला.

झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाच्या वतीने सुमारे ८७५ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.

महापालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे आणि उमेश मोने यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि कारवाईचा आढावा घेतला.

फुगेवाडी आणि हडपसर परिसरात विषारी गावठी दारू प्राशनामुळे झालेल्या मृत्यूंनी राज्यभरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह आठ आरोपींना अटक केली असून, त्यामध्ये गुरमंगतसिंह कर्नेलसिंह वीरका याचाही समावेश आहे. पोलिस तपासात फुगेवाडीतील ज्या घरातून अवैध दारूविक्री सुरू होती, ते बांधकाम अनधिकृत असल्याचे महापालिकेच्या पडताळणीत स्पष्ट झाले होते. पालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने संबंधित बांधकामधारकाला नोटीस बजावून २४ तासांच्या आत बांधकाम अधिकृत असल्याचे पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले होते.

# इंधन दरवाढीचा पीएमपीएमएलला मोठा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** वाढती वाहनसंख्या, घटती प्रवासी संख्या आणि देखभाल-दुरुस्तीवरील वाढता खर्च यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपीएमएल) आता इंधन दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. मागील महिनाभरात सीएनजी आणि डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे पीएमपीचा मासिक खर्च लाखो रुपयांनी वाढला असून प्रशासनासमोर आर्थिक नियोजनाचे नवे आव्हान उभे राहिले आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्रात सुमारे १,७०० बसद्वारे पीएमपी सेवा पुरवते. यापैकी १,१६० बस सीएनजीवर, तर २३३ बस डिझेलवर धावतात. या बससाठी दररोज सुमारे ९० हजार किलो सीएनजी आणि ६ हजार लिटर डिझेलची आवश्यकता भासते.

मागील २५ दिवसांत सीएनजीच्या दरात प्रतिकिलो १ रुपये ५० पैशांची, तर डिझेलच्या दरात प्रतिलिटर तब्बल ७ रुपये ८० पैशांची वाढ झाली आहे. एक मे रोजी पीएमपीला सीएनजी ८९ रुपये प्रतिकिलो आणि डिझेल ९०.५३ रुपये प्रतिलिटर दराने उपलब्ध होत होते. सध्या सीएनजीचा दर ९०.५० रुपये, तर डिझेलचा दर ९८.३३ रुपयांवर पोहोचला आहे. यापूर्वी घाऊक खरेदीमुळे पीएमपीला सीएनजीवर प्रतिकिलो १.७५ रुपये आणि डिझेलवर प्रतिलिटर ८० पैशांची सवलत मिळत होती. मात्र डिझेलचे दर वाढू लागल्यानंतर पुरवठादार कंपन्यांनी ही सवलत बंद केली. त्यामुळे इंधन खर्चात आणखी वाढ झाली आहे.

दरमहा सीएनजीसाठी सुमारे २४ ते २५ कोटी रुपये आणि डिझेलसाठी सुमारे १.६० कोटी रुपये खर्च होत होता. आता सीएनजीवरील खर्चात सुमारे ४० लाख रुपयांची, तर डिझेलवरील खर्चात १५ लाख रुपयांची वाढ झाली आहे. परिणामी, पीएमपीच्या मासिक आर्थिक नियोजनावर अतिरिक्त ५० ते ५५ लाख रुपयांचा बोजा पडत आहे.

इंधन दरवाढीमुळे पुन्हा तिकीट दरवाढ होणार का, याबाबत प्रवाशांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. गेल्या वर्षी १ जूनपासून पीएमपीने तिकीट दरात बदल केला होता. त्यानुसार १ ते ३० किलोमीटर अंतरासाठी पाच किलोमीटरच्या टप्प्यांनुसार आणि त्यापुढे ३० ते ८० किलोमीटरसाठी दहा किलोमीटरच्या टप्प्यांनुसार नवी दररचना लागू करण्यात आली होती. मासिक पासच्या दरातही वाढ करण्यात आली होती. मात्र, सध्याच्या परिस्थितीत इंधन दरवाढीचा भार प्रवाशांवर टाकण्याचा कोणताही विचार नसल्याचे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जादा परताव्याचे आमिष; महिलेची ५० लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** गुंतवणुकीवर जादा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत पिंपळे निलख येथील एका महिलेची तब्बल ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात एका दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

याबाबत शिल्पा संदेश गोडसे (वय ४०, रा. अक्षयनगर फेज-१, विशालनगर, पिंपळे निलख) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार स्मिता अंबरिश जोशी आणि अंबरिश जोशी (दोघेही रा. अक्षयनगर फेज-१, विशालनगर, पिंपळे निलख) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दाम्पत्याने फिर्यादीला गुंतवणुकीवर आकर्षक आणि जादा परतावा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. या आमिषाला बळी पडलेल्या फिर्यादीकडून आरोपींनी वेळोवेळी मोठ्या रकमा स्वीकारल्या. १० जानेवारी २०२३ पासून ते आजपर्यंतच्या कालावधीत विविध कारणांनी पैसे घेत एकूण ५० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

फिर्यादीला गुंतवणुकीतून मोठा नफा मिळणार असल्याचे वारंवार सांगण्यात आले. मात्र, अपेक्षित परतावा न मिळाल्याने आणि दिलेली रक्कम परत न केल्याने फसवणुकीचा प्रकार उघड झाला. त्यानंतर महिलेने सांगवी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसून पोलीस उपनिरीक्षक म्हैशाळे आणि पोलीस उपनिरीक्षक आकमवाड हे प्रकरणाचा तपास करत आहेत.

### पान शॉपवर कारवाई

**पिंपरी :** शहरातील महेशनगर परिसरातील एका पान शॉपवर अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करत संबंधित दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई गुरुवारी (ता. ४) दुपारी करण्यात आली.

याप्रकरणी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२६ नोंद करण्यात आला आहे. विविध कलमान्वये ही कारवाई करण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी सायली शंकर टावरे (वय ३३) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पुणे कार्यालयात कार्यरत आहेत.

महेशनगर येथील 'श्रद्धा पान शॉप अँड स्टोअर्स' या दुकानाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच अन्न व औषध प्रशासनाने जारी केलेल्या शासन अधिसूचनेतील नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. यानंतर दुकान चालक गजानन बाळाजी चिमेगाव (वय २८, रा. संत ज्ञानेश्वर कॉलनी, थेरगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### जुन्या वादातून हल्ला

**खेड :** खेड तालुक्यातील मेदनकरवाडी येथे जुन्या वादातून एका व्यक्तीवर काचेच्या बाटलीने हल्ला केल्याची घटना घडली असून या हल्ल्यात एक जण जखमी झाला आहे. याप्रकरणी दक्षिण चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जून रोजी दुपारी सुमारे साडेदोन वाजण्याच्या सुमारास सद्गुरू कॉम्प्लेक्स परिसरात रविंद्र बाळासाहेब मेदनकर (वय ३८, रा. मेदनकरवाडी, ता. खेड) हे आपल्या मित्रांसमवेत गप्पा मारत बसले होते. त्यावेळी दीपक दादाजी नवसरे (वय ४०, रा. मेदनकरवाडी, ता. खेड) हा तेथे आला. आरोपीने फिर्यादीवर पत्नीची बदनामी करत असल्याचा आरोप करत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर संतापाच्या भरात त्याने हातातील काचेची बाटली फिर्यादीच्या डोक्यात मारली. या हल्ल्यात रविंद्र मेदनकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. तसेच स्वतःचा बचाव करण्याच्या प्रयत्नात त्यांच्या हातालाही काचेचे तुकडे लागून जखम झाली. याप्रकरणी दक्षिण चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली लाखोंचा गंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पोलिस अधिकारी असल्याचे भासवत आणि 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत एका नागरिकाची तब्बल ५५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पुणे सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० मे ते ३ जून या कालावधीत भोसरी परिसरातील एका नागरिकाशी अज्ञात आरोपींनी संपर्क साधला. त्यांनी स्वतःला दूरसंचार विभाग, सीबीआय तसेच इतर शासकीय संस्थांचे अधिकारी असल्याचे सांगून फिर्यादीचा आधार क्रमांक मनी लॉन्ड्रिंग आणि अमली पदार्थांच्या गुन्ह्यात वापरण्यात आल्याचा खोटा दावा केला. यानंतर आरोपींनी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधत पोलिस कारवाई, चौकशी आणि अटकेची भीती दाखवली. तसेच कोणालाही या प्रकरणाची माहिती देऊ नये आणि घराबाहेर पडू नये, अशा सूचना करून फिर्यादीला मानसिक दबावाखाली ठेवले.

फिर्यादीच्या बँक खात्यातील रकमेची पडताळणी करून ती सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने आरोपींनी विविध बँक खात्यांमध्ये पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडले. अशाप्रकारे एकूण ५५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जमिनीच्या वादातून जीवघेणा हल्ला

**भिगवण :** इंदापूर तालुक्यातील अकोले परिसरात जमिनीच्या वादातून एकाच कुटुंबातील सदस्यांवर कोयता, लोखंडी पाईप आणि लोखंडी गजाने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात कुटुंबातील सदस्य जखमी झाले असून भांडण सोडवण्यासाठी आलेल्या महिलांनाही मारहाण करण्यात आली. तसेच एका महिलेचा विनयभंग करून तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना अकोले (ता. इंदापूर) ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ४१४ मधील शेतजमिनीत बुधवारी सकाळी सुमारे सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी भिगवण पोलिस ठाण्यात सात जणांविरुद्ध विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सतीश रामदास आवाड (वय ४०, रा. वायसेवाडी, ता. इंदापूर) यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**लोणी काळभोर :** थेऊर फाटा परिसरातील नयन बार हॉटेलजवळ सुरू असलेल्या कथित जुगार अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी गुरुवारी (ता. ४) दुपारी छापा टाकला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळणारे आणि जुगार चालविणारे इसम पळ काढण्यात यशस्वी झाले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगाराचे साहित्य जप्त केले असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास कांबळे आणि रमेश तुपे अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार सचिन भिमराव सोनवणे यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दाखल केली आहे. थेऊर फाटा येथील नयन बार हॉटेलजवळ पत्र्याच्या शेडच्या आडोशाला अवैध जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे लोणी काळभोर पोलिसांनी दुपारी अचानक छापा टाकला. पुढील तपास सुरू आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने ग्रामीण पुण्यात खळबळ

# गायरान जमिनी पीएमआरडीएकडे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जिल्ह्यातील ६०६ ग्रामपंचायतींच्या गायरान जमिनी पीएमआरडीएकडे वर्ग करण्याच्या जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशामुळे ग्रामीण भागात मोठी खळबळ उडाली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील तब्बल २,०९४ हेक्टर ३९ आर गायरान जमीन विनामूल्य प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्याने ग्रामपंचायतींचे अधिकार, ग्रामीण विकासकामे आणि पशुपालकांच्या हितावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



२ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार पीएमआरडीए क्षेत्रातील गायरान जमिनी प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पुणे जिल्ह्यातील हवेली, मुळशी, मावळ, खेड, भोर, पुरंदर, दौंड आणि शिरूर तालुक्यांतील शेकडो गावांवर परिणाम होणार आहे. विशेषतः ग्रामपंचायतींच्या ताब्यातील सार्वजनिक वापराच्या जमिनी कमी होण्याची शक्यता असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या निर्णयाविरोधात पुणे जिल्हा परिषदेने आक्रमक भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद बुट्टे पाटील यांच्यासह उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन या निर्णयात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. गायरान जमिनींचे हस्तांतरण तात्काळ थांबवून अधिसूचना रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींच्या दृष्टीने गायरान जमीन ही केवळ रिकामी जागा नसून गावाच्या भविष्यातील विकासाचा आधार मानली जाते. स्मशानभूमी, खेळाची मैदाने, पाणीपुरवठा योजना, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक इमारती आणि विविध विकासकामांसाठी या जमिनींचा उपयोग केला जातो. या जमिनी पीएमआरडीएकडे गेल्यास भविष्यात ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी जागेची मोठी अडचण निर्माण होऊ शकते. याशिवाय ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी गायरान क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. जनावरांच्या चराईसाठी उपलब्ध असलेल्या जमिनींचे क्षेत्र कमी झाल्यास पशुपालन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालक संघटनांनीही या निर्णयाबाबत चिंता व्यक्त केली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने शासनाच्या विद्यमान नियमांकडेही लक्ष वेधले आहे. महसूल व वन विभागाच्या २०११ च्या आदेशानुसार गावातील गायरान क्षेत्र एकूण शेतीक्षेत्राच्या किमान पाच टक्के असणे आवश्यक आहे. तसेच गायरान जमीन इतर कारणांसाठी वापरण्यापूर्वी ग्रामसभेची मंजुरी, जिल्हा परिषदेची शिफारस आणि पर्यायी जमीन उपलब्ध नसल्याची खात्री करणे आवश्यक असल्याचे नियम आहेत. या प्रक्रियेचे पालन न करता अधिसूचना जारी केल्याचा आक्षेप जिल्हा परिषदेकडून घेण्यात आला आहे.

तालुकानिहाय पाहता खेड तालुक्यातील सर्वाधिक सुमारे ७४० हेक्टरपेक्षा अधिक गायरान जमीन हस्तांतरणाच्या कक्षेत येत आहे. त्याखालोखाल मावळ, पुरंदर, हवेली आणि लोणीकाळभोर परिसरातील मोठे क्षेत्र या प्रक्रियेत समाविष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींमध्ये अस्वस्थता वाढली आहे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रश्नावर आता राज्य सरकार काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गायरान जमिनींचे हस्तांतरण अपरिहार्य असल्यास संबंधित ग्रामपंचायतींना समतुल्य पर्यायी जमीन देण्यात यावी, अशी मागणीही पुढे येत आहे. त्यामुळे आगामी काळात हा विषय पुणे जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे आहेत.

## पुणे जिल्ह्यात पाणीटंचाई तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्ह्यात उन्हाळ्याच्या अखेरीस पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर बनत असून, जिल्ह्यातील १११ गावे आणि ४२६ वाड्यांमधील सुमारे पावणेदोन लाख नागरिकांना सध्या १०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर हे तालुके सर्वाधिक पाणीटंचाईग्रस्त ठरले असून, पावसाचे आगमन आणखी लांबल्यास परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, वाढत्या उष्णतेमुळे जलस्रोत आटू लागले असून ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. गेल्या आठवड्यात सुमारे १ लाख ७३ हजार नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, टंचाईची व्याप्ती वाढल्याने ही संख्या आता पावणेदोन लाखांच्या घरात पोहोचली आहे. टँकरद्वारे केवळ नागरिकांनाच नव्हे, तर सुमारे ३,०३० पशुधनालाही पाणीपुरवठा केला जात आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुधनासाठीही पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर तालुक्यांमध्ये पाण्याचे स्रोत झपाट्याने कमी होत असल्याने टँकरवरील अवलंबित्व वाढले आहे.

हवामान तज्ज्ञांनी यंदा 'एल-निनो'च्या प्रभावामुळे मान्सूनच्या आगमनात विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे जून महिन्यातही पुरेसा पाऊस न झाल्यास टँकरची संख्या आणखी वाढू शकते. संभाव्य संकट लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने ८७ विहिरींचे संपादन केले असून आवश्यकतेनुसार त्यांचा वापर केला जाणार आहे. जिल्ह्यातील ४३ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती व देखभाल कामांना मान्यता देण्यात आली असून त्यासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## उत्पन्न दाखल्याअभावी शिक्षणापासून वंचित ठेवू नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** आरटीई प्रवेश तसेच उच्च शिक्षणासाठी वडिलांचा उत्पन्नाचा दाखला अनिवार्य केल्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षण योजनांपासून वंचित राहत असल्याची बाब समोर आली आहे. अशा प्रकरणांमध्ये आईचा उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सदस्या सुनीता शरद बुट्टे पाटील यांनी केली आहे.



जिल्हा परिषद स्थायी समितीच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी सांगितले की, अनेक कुटुंबांमध्ये पती-पत्नी विभक्त राहत असतात, काहींचा घटस्फोट झालेला असतो किंवा न्यायालयीन वाद सुरू असतात. अशा परिस्थितीत आई स्वतंत्रपणे मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळत असते. मात्र, वडिलांचा उत्पन्नाचा दाखला उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांना आरटीई प्रवेश आणि विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होत आहेत. यावर्षी अनेक विद्यार्थी केवळ उत्पन्नाच्या दाखल्याच्या अटीमुळे आरटीई प्रवेशापासून वंचित राहिल्याचे तसेच उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या योजनांचा लाभ मिळू शकला नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि शिक्षण घेण्याची जिद्द असूनही प्रशासकीय नियमांमुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अशा विशेष परिस्थितीतील प्रकरणांमध्ये आईचा उत्पन्नाचा दाखला स्वीकारून विद्यार्थ्यांना शिक्षण योजनांचा लाभ देण्याची व्यवस्था शासनाने करावी, अशी मागणी त्यांनी केली.

या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा परिषद स्थायी समितीचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यासंदर्भात राज्य शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या. या प्रस्तावामुळे विभक्त कुटुंबांतील आणि एकल पालकांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ट्रान्सफॉर्मर चोरी रोखण्यासाठी ठराव

### सुनिता बुट्टे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** ग्रामीण भागातील महावितरणच्या ट्रान्सफॉर्मर चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच चोरी झालेल्या ट्रान्सफॉर्मरची तातडीने उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी पुणे जिल्हा परिषद स्थायी समितीने महत्त्वाचा ठराव मंजूर केला आहे. स्थायी समिती सदस्या सुनिता शरद बुट्टे पाटील यांच्या पुढाकारातून हा विषय जिल्हा परिषदेत मांडण्यात आला होता.



ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्या तसेच शेतीपंपांना वीजपुरवठा करणारे महावितरणचे ट्रान्सफॉर्मर वारंवार चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चोरी झाल्यानंतर नवीन ट्रान्सफॉर्मर मिळवण्यासाठी पोलिसांत गुन्हा दाखल करणे आणि महावितरणच्या शाखा अभियंत्यांचा अहवाल आवश्यक असतो. मात्र, अनेकदा चोरीच्या गुन्ह्यांची संख्या वाढू नये या कारणास्तव तक्रारी नोंदविण्यात विलंब होत असल्याची बाब समोर आली आहे. यामुळे नवीन ट्रान्सफॉर्मर मिळण्यास उशीर होतो आणि शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित राहतो. परिणामी, शेतीची कामे ठप्प होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सुनिता बुट्टे पाटील यांनी ८ मे २०२६ रोजी झालेल्या जिल्हा परिषद स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय उपस्थित केला होता. त्यानंतर गुरुवारी (दि. ४) स्थायी समितीने यासंदर्भातील कार्यवृत्त अंतिम करत महत्त्वाचा ठराव मंजूर केला.

ठरावानुसार पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त आणि पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक यांना पत्र पाठविले आहे. या पत्रामध्ये ट्रान्सफॉर्मर चोरीच्या तक्रारी तत्काळ नोंदवून घेण्यासह अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ट्रान्सफॉर्मर चोरीच्या घटनांकडे पोलिस यंत्रणा अधिक गांभीर्याने पाहील आणि चोरी झाल्यानंतर शेतकऱ्यांना नवीन ट्रान्सफॉर्मर मिळविण्याची प्रक्रिया वेगवान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सुनिता बुट्टे पाटील म्हणाल्या, ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. ट्रान्सफॉर्मर चोरीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार आहोत. ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी हा ठराव महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## केटीइएसच्या विद्यार्थ्यांची स्केटिंग स्पर्धेत चमक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या मिशन ऑलिम्पिक गेम्स असोसिएशनच्या खुल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. राज्यभरातून ३८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत शाळेच्या १३ विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई करत संस्थेचा नावलौकिक वाढविला.

स्पर्धेत मुकुंद अजय चौधरी याने सुवर्णपदक पटकावले. प्रांजल धनेश कांबळे, साक्षी प्रवीण फदाले, अनिरुद्ध दीपक चव्हाण आणि युवराज महेंद्र कर्वे यांनी रौप्यपदकांची कमाई केली. तर सौजन्या मलसिद्धा म्हेत्रे, दक्ष श्रीकांत गोरडे, सोहम सतीश घोडके, संभव उमेश शाह, स्वरा संतोष गोपाळे, अनुराग संदीप ढोरे, शांभवी सुधीर मांजरे आणि अंश स्वप्नील वाडनेरे यांनी कांस्यपदक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले.

या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट स्केटिंगचे प्रदर्शन करत स्पर्धेत आपला ठसा उमटविला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, सचिव गणेश जोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्य गणेश देठे तसेच मानसी मिडगे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे राजगुरुनगर परिसरात आनंदाचे वातावरण असून, क्रीडा क्षेत्रातही केटीइएसच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी कायम असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## सरदवाडी घाटातील हत्याकांडाने पुणे हादरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शिरूर तालुक्यातील सरदवाडी घाटात दिवसाढवळ्या घडलेल्या थरारक हत्याकांडामुळे संपूर्ण पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगार विशाल काळे याची त्याच्याच माजी साथीदारांनी महामार्गावर गाडी अडवून अंदाधुंद गोळीबार करत हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे शिरूर तालुक्यात वाढत्या टोळीयुद्धाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून गुन्हेगारी टोळ्यांमधील वर्चस्वाच्या संघर्षाने धोकादायक वळण घेतल्याची चर्चा सुरू झाली आहे.

तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, मृत विशाल काळे आणि मुख्य आरोपी सनी यादव हे एकेकाळी एकाच टोळीचे सदस्य होते. शिरूर शहरातील माजी नगरसेवक महेंद्र मल्लाव यांच्या सुमारे सात ते आठ वर्षांपूर्वी झालेल्या निर्घृण हत्येनंतर या टोळीचे नाव गुन्हेगारी जगतात चर्चेत आले होते. भर लोकवस्तीत घडलेल्या त्या हत्याकांडामुळे टोळीचा प्रभाव वाढला होता. खटला अद्याप न्यायालयात प्रलंबित असतानाच जामिनावर बाहेर आलेल्या आरोपींनी पुन्हा गुन्हेगारी कारवायांना सुरुवात केल्याचे सांगितले जात आहे.

जामिनावर सुटल्यानंतर स्वतंत्र वर्चस्व निर्माण करण्याच्या उद्देशाने या टोळीने हडपसर, चंदननगर, वाघोली तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातील काही कुख्यात गुन्हेगारांशी हातमिळवणी केल्याची माहिती समोर येत आहे. अपहरण, खून, खंडणी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये या टोळीतील सदस्यांवर विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. परिसरात या टोळीची वाढती दहशत नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनली आहे.

## पर्यावरण दिनानिमित्त बीजगोळ्यांची निर्मिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सितेवाडी येथे विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने बीजगोळा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रवाढ आणि स्थानिक वृक्षप्रजातींच्या जतनासाठी आयोजित या उपक्रमाला बालक, युवक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहभागींच्या सहकार्याने सुमारे सहा हजार बीजगोळ्यांची निर्मिती करण्यात आली.

वनविभाग जुन्नर, चाइल्डफंड इंडिया, ग्रामपंचायत सितेवाडी, प्रेरणा युथ क्लब आणि शीतळेश्वर हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीतून लोकसहभाग वाढविणे आणि जैवविविधतेच्या संवर्धनाबाबत जनजागृती करणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात ११४ बालक, युवक आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला. बीजगोळा तयार करण्याच्या माध्यमातून सहभागींना पर्यावरणीय पुनर्स्थापना, वनीकरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाविषयी प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रमाला पुणे वनविभागाचे प्रमुख समीर इंगळे आणि जुन्नर वनविभागाचे रमेश खेरमळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी बीजगोळे तयार करण्याच्या शास्त्रीय पद्धतीबाबत मार्गदर्शन करत वनसंवर्धन आणि जैवविविधता जपण्यासाठी या उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले.



उपक्रमादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी बीजगोळा निर्मितीची प्रक्रिया समजून घेतली. वरिष्ठ प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने यांच्या मार्गदर्शनाखाली फील्ड कोऑर्डिनेटर अजित सोर, मुक्ता गिरी, ज्योती शिवमोरे, प्रवीण जगताप, रोहन शेळके, शहाजी कसबे, अनंता बोराडे, योगेश मस्करे, रवी शिंदे, संजय नवले, मंगेश आतकरी, दिपाली जगताप, शेवंता वाघ आणि विश्वास गालफडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मुक्ता गिरी यांनी केले, तर आभार शहाजी कसबे यांनी मानले.

### महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब

# अजिंक्य डी. वाय. पाटील अभियांत्रिकीला एनबीए मानांकन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** लोहगाव येथील अजिंक्य डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंगच्या तीन अभियांत्रिकी शाखांना नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशन (एनबीए) कडून तीन वर्षांसाठी मानांकन प्राप्त झाले आहे. अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात एनबीए मानांकनाला विशेष महत्त्व मानले जाते. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर शिक्कामोर्तब झाले आहे.



महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या पदवी अभ्यासक्रमांना २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी एनबीएकडून मान्यता मिळाली आहे. या मानांकनामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

एनबीएच्या सात सदस्यीय समितीने डॉ. मित्तल यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची सखोल पाहणी केली. यावेळी शिक्षण प्रणाली, अध्यापन पद्धती, प्राध्यापकांची गुणवत्ता व उपलब्धता, संशोधन व सल्लागार सेवा, विद्यार्थ्यांचा यशाचा दर, करिअर मार्गदर्शन, प्लेसमेंट, पायाभूत सुविधा, प्रकल्प, विद्यार्थ्यांचा अभिप्राय आणि परिणामाधारित शिक्षण पद्धती यांचे मूल्यमापन करण्यात आले. तसेच विविध विभागांना भेट देऊन आवश्यक कागदपत्रांची तपासणीही करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांनी या यशाबद्दल सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाची ही राष्ट्रीय पातळीवरील दखल असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम ठेवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. जैन यांनीही महाविद्यालयाचे विशेष अभिनंदन करताना हे यश सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फारूक सय्यद यांनी या यशाचे श्रेय संस्थेचे व्यवस्थापन, विभागप्रमुख, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्यांना दिले. एनबीए मान्यता ही संस्थेच्या परिणामाधारित शिक्षण आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीच्या प्रयत्नांची पावती असल्याचे त्यांनी सांगितले. या मूल्यांकन प्रक्रियेत कुलगुरू डॉ. आर. के. जैन, प्राचार्य डॉ. फारूक सय्यद, सर्व डीन, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

## पाटसमध्ये दोन गटांत राडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** पाटस येथे दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारी, दगडफेक आणि गोळीबारात झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत काही संशयित तरुणांना ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील काही तरुण पाटसमधील गरदडे कॉम्प्लेक्स परिसरात आले होते. यावेळी त्यांचा स्थानिक तरुणांशी वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाल्यानंतर दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाली. त्यानंतर परिस्थिती चिघळत दगडफेकीपर्यंत पोहोचली. दगडफेकीत एका चारचाकी वाहनाचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. काही तरुण घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

दरम्यान, वाद अधिक तीव्र झाल्यानंतर हवेत चार वेळा गोळीबार करण्यात आल्याचा दावा प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. गोळीबारानंतर संबंधित तरुणांनी घटनास्थळावरून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ हालचाली करत परिसरात शोधमोहीम सुरू केली. काही तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### कांगपोकपीत तिघे जण ठार

**इंफाळ :** मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यातील एका गावात शुक्रवारी पहाटे सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात एका महिलेसह तीन जण ठार झाले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सैतू-गमफाझोल उपविभागातील लोईबोल खुलेन गावात पहाटे ४ च्या सुमारास झालेल्या हल्ल्यात किमान सात घरे जळून खाक झाली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रतिस्पर्धी गटांमध्ये अनेक मिनिटे झालेल्या चकमकीत या तिघांचा मृत्यू झाला, ज्यामुळे ग्रामस्थांना जवळच्या जंगलात आश्रयासाठी धाव घ्यावी लागली.

### झारखंडमधून झामुमो लढण्याची शक्यता

**रांची :** झारखंडमधील राजकीय वातावरण १८ जून रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीव्र झाले असून सत्ताधारी झामुमोच्या आमदारांनी शुक्रवारी दोन्ही जागा लढवण्याची मागणी केली. राज्यसभेच्या दोन जागांपैकी एका जागेसाठी काँग्रेसने पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रणव झा यांना उमेदवार म्हणून जाहीर केल्याच्या दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. पक्षाच्या आमदारांनी सांगितले की, दोन्ही जागांवर निवडणूक लढविण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल.

### सीफूड क्षेत्रात भारताला संधी

**विशाखापट्टणम :** सागरी अन्न आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रात भारतासाठी प्रचंड संधी उपलब्ध असून मूल्यवर्धन, तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग आणि जागतिक दर्जाच्या पुरवठा साखळीच्या माध्यमातून देश निर्यातीत मोठी झेप घेऊ शकतो, असे मत आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री नारा चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केले. विशाखापट्टणम येथे आयोजित राष्ट्रीय सागरी अन्न निर्यात कार्यशाळेत ते बोलत होते. केंद्र सरकारच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या पुढाकाराने आयोजित या कार्यशाळेत केंद्रीय मंत्री, उद्योग प्रतिनिधी, निर्यातदार आणि विविध राज्यांतील अधिकारी सहभागी झाले होते.

## जागतिक आव्हाने असतानाही जीडीपी दर ७.७ टक्के

# भारतीय अर्थव्यवस्थेची दमदार कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** जागतिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि इंधनाच्या वाढत्या किमती यांसारख्या आव्हानात्मक परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, देशाचा वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढदर ७.७ टक्के राहिला असून, मागील आर्थिक वर्षातील ७.१ टक्क्यांच्या तुलनेत त्यात वाढ झाली आहे.

जानेवारी ते मार्च या चौथ्या तिमाहीतील मजबूत कामगिरीमुळे संपूर्ण आर्थिक वर्षातील विकासदराला बळ मिळाले. या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था ७.८ टक्क्यांच्या वेगाने वाढली. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या अखेरीस विकासाचा वेग कायम राहिल्याचे स्पष्ट झाले आहे.

२०२२-२३ या स्थिर किमतींवर आधारित वास्तविक जीडीपी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३२३.१२ लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याचा अंदाज आहे. मागील आर्थिक वर्षात हा आकडा २९९.८९ लाख कोटी रुपये होता. त्याचवेळी महागाईचा प्रभाव समाविष्ट करणारा नाममात्र जीडीपी ८.९ टक्क्यांनी वाढून ३४६.३६ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये तो ३१८.०७ लाख कोटी रुपये होता.

स्थूल मूल्यवर्धन अर्थात जीव्हीएमध्येही लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. कर आणि अनुदानांचा प्रभाव वगळून मोजण्यात येणारा वास्तविक जीव्हीए ७.९ टक्के राहिला असून, मागील वर्षी तो ७.३ टक्के होता. नाममात्र जीव्हीए ९.१ टक्क्यांनी वाढून ३१४.८७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. यावरून अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये संतुलित वाढ झाल्याचे दिसून येते. सेवा क्षेत्राने नेहमीप्रमाणे विकासात सर्वाधिक योगदान दिले आहे. त्याचबरोबर उत्पादन, बांधकाम आणि इतर औद्योगिक क्षेत्रांनीही अर्थव्यवस्थेच्या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावली. देशांतर्गत मागणी मजबूत राहिल्याने उद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना मिळाल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट होते.

आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत वास्तविक जीडीपी ८७.७७ लाख कोटी रुपये नोंदवला गेला. मागील वर्षाच्या याच कालावधीत तो ८१.४० लाख कोटी रुपये होता. यामध्ये ७.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर नाममात्र जीडीपी ९.१ टक्क्यांनी वाढून ९४.६५ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मार्च तिमाहीत वास्तविक जीव्हीएमध्ये ७.९ टक्के आणि नाममात्र जीव्हीएमध्ये ९.९ टक्के वाढ नोंदवण्यात आली. जागतिक स्तरावरील आर्थिक आणि राजकीय आव्हानांनंतरही देशांतर्गत मागणी, गुंतवणूक आणि उत्पादनक्षमता टिकून राहिल्याने अर्थव्यवस्थेला बळ मिळाले आहे.

सरकारने स्पष्ट केले आहे की, हे अंदाज औद्योगिक उत्पादन, वस्तू व सेवा कर संकलन, कंपन्यांचे आर्थिक निकाल, वाहन विक्री, मालवाहतूक, दूरसंचार सेवा वापर, बँकिंग व्यवहार, करसंकलन आणि व्यापाराशी संबंधित विविध निर्देशकांच्या आधारे तयार करण्यात आले आहेत. यात चौथ्या तिमाहीतील माहिती तसेच आधीच्या तिमाहींच्या आकडेवारीचाही समावेश करण्यात आला आहे. भविष्यातील जीडीपी आकडे २०२२-२३ या पायाभूत वर्षावर आधारित सुधारित औद्योगिक उत्पादन निर्देशांक आणि घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रसिद्ध केले जाणार आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीचे, म्हणजे एप्रिल ते जून या कालावधीतील जीडीपीचे आकडे ३१ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येणार असल्याचे मंत्रालयाने सांगितले आहे.

## जंगली हत्तीच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इरोड :** तामिळनाडूतील इरोड जिल्ह्यातील थलावडी टेकड्यांमध्ये जंगली हत्तीच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. वनक्षेत्रालगत असलेल्या शेतात काम करत असताना हत्तीने शेतकऱ्यावर हल्ला केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

वनविभाग आणि पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्तींचा एक कळप शेत परिसरात घुसला होता. यावेळी एका हत्तीने शेतकऱ्यावर अचानक हल्ला करून त्याला चिरडले. घटनेदरम्यान शेतकऱ्याच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून स्थानिक नागरिक घटनास्थळी धावले. मात्र, तोपर्यंत संबंधित शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

पश्चिम घाट परिसरातील थलावडी आणि आसपासचा भाग हत्तींच्या नियमित वावरासाठी ओळखला जातो. या भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांकडून हत्तींकडून पिकांचे नुकसान तसेच मानवी जीविताला निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत वारंवार तक्रारी करण्यात येत आहेत.

वाढत्या मानव-हत्ती संघर्षाबाबत वनविभागानेही चिंता व्यक्त केली आहे. हत्तींचा वावर नियंत्रित करण्यासाठी सौर कुंपण उभारणे, विशेष पथके तैनात करणे आणि जनजागृती मोहीम राबविणे यांसारखे उपाय करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, स्थानिक नागरिकांनी दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजनांची मागणी केली आहे.

## भाजपचा इंडिया आघाडीवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ८ जून रोजी नवी दिल्लीत आयोजित इंडिया आघाडीच्या बैठकीला द्रमुकने अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्यानंतर विरोधी पक्षांच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने आघाडीवर जोरदार टीका करत ती आता केवळ नावापुरती उरल्याचा दावा केला आहे.

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी द्रमुकच्या निर्णयाचा उल्लेख करत इंडिया आघाडीला मृत झालेली आघाडी असे संबोधले. विधानसभा निवडणुकांनंतर विरोधी पक्षांच्या या आघाडीचे अस्तित्व संपुष्टात आल्याचे त्यांनी म्हटले. तामिळनाडूतील राजकीय घडामोडींनंतर द्रमुक आणि काँग्रेसमधील मतभेद उघडपणे समोर आले आहेत. विधानसभा निवडणुकीत विजयी ठरलेल्या टीव्हीके पक्षाला काँग्रेसने पाठिंबा दिल्यामुळे द्रमुकमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. याच कारणामुळे द्रमुकने ८ जूनच्या बैठकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

या संदर्भात प्रतिक्रिया देताना शहजाद पूनावाला म्हणाले की, इंडिया आघाडी आता केवळ कागदोपत्री आणि दूरचित्रवाणीवरील चर्चांपुरती मर्यादित राहिली आहे. द्रमुकने काँग्रेसवर विश्वासघाताचा आरोप केला असून त्यामुळेच त्यांनी बैठकीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसची मित्रपक्षांमधील विश्वासार्हता कमी झाल्याचे दिसून येत असल्याचा दावा त्यांनी केला.

आघाडीतील पक्षांची भूमिका परस्परविरोधी असल्याचाही आरोप भाजपने केला. केरळमध्ये काँग्रेस आणि डावे पक्ष एकमेकांविरोधात निवडणूक लढवतात, बंगालमध्ये विरोधी पक्षांमध्ये संघर्ष सुरू असतो, तर राष्ट्रीय स्तरावर ते एकत्र येण्याचा प्रयत्न करतात, अशी टीका पूनावाला यांनी केली.

## तृणमूल काँग्रेसचे खासदारही फूटीच्या मार्गावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत असंतोष उघडपणे समोर येऊ लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्षातील काही आमदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर आता पक्षाच्या संसदीय गटातही नाराजी वाढत असल्याचे वृत्त समोर आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, तृणमूल काँग्रेसच्या काही लोकसभा खासदारांमध्ये स्वतंत्र गट स्थापन करण्याबाबत चर्चा सुरू आहे. सध्या लोकसभेत पक्षाचे २९ तर राज्यसभेत १३ सदस्य आहेत. पक्षांतरविरोधी कायद्याच्या तरतुदीनुसार स्वतंत्र गटाला मान्यता मिळण्यासाठी आवश्यक संख्याबळाची जुळवाजुळव करण्याच्या शक्यतांवरही काही नेत्यांकडून विचार सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

वृत्तांनुसार, काही ज्येष्ठ खासदार या हालचालींच्या केंद्रस्थानी असल्याचे म्हटले जात असले तरी याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. पक्षातील घडामोडींवर लक्ष ठेवणाऱ्या राजकीय निरीक्षकांच्या मते, चर्चा अद्याप प्राथमिक टप्प्यात असून पुढील काही दिवसांत परिस्थिती अधिक स्पष्ट होऊ शकते. या असंतोषामागे पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्या नेतृत्वशैलीबाबत काही नेत्यांमध्ये निर्माण झालेली नाराजी कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. पक्षाच्या निर्णयप्रक्रिया आणि संघटनात्मक कामकाजाबाबत काही खासदारांमध्ये असमाधान असल्याची चर्चा आहे. मात्र या संदर्भात संबंधित नेत्यांकडून अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही.

विधानसभेतील काही बंडखोर आमदारांच्या हालचालींमुळे पक्ष नेतृत्वाची चिंता वाढली आहे. बंडखोर गटाशी संबंधित मानले जाणारे काही नेते भविष्यात आणखी मोठ्या राजकीय घडामोडी होऊ शकतात, असे संकेत देत आहेत. राज्यसभेतील ज्येष्ठ खासदार सुखेंदू शेखर राय यांनीही अलीकडील घडामोडींवर चिंता व्यक्त केली असून पक्षातील परिस्थिती गांभीर्याने हाताळण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख ममता बॅनर्जी यांनी स्वतः पुढाकार घेत संघटनात्मक पातळीवर संवाद वाढविण्यास सुरुवात केल्याचे समजते. आमदारांशी संपर्क साधून त्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. पक्षातील मतभेद मिटवून एकजूट कायम ठेवण्यावर नेतृत्वाचा भर असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## ३ कोटींहून अधिक युजर आयडी निष्क्रिय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** रेल्वे तिकीट बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी आयआरसीटीसीने मोठी मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत ३ कोटींहून अधिक संशयास्पद युजर आयडी निष्क्रिय करण्यात आले असून आणखी ६ कोटी खात्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

कन्फर्म रेल्वे तिकिटे मिळण्यात येणाऱ्या अडचणींबाबत प्रवाशांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. त्यानंतर आयआरसीटीसीने बनावट खाती, बॉट्स आणि दलालांच्या माध्यमातून होणाऱ्या गैरव्यवहारांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे.

आयआरसीटीसीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात प्राप्त झालेल्या ५०१ तक्रारींच्या आधारे ४.२ लाख संशयास्पद पीएनआरची तपासणी करण्यात आली. तसेच तिकीट बुकिंगमधील संशयास्पद हालचालींशी संबंधित १३,३४३ ई-मेल डोमेन ब्लॉक करण्यात आले आहेत. पीक बुकिंगच्या कालावधीत तिकिटे काही मिनिटांत संपून जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. बनावट खात्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर तिकिटे बुक करून ती नंतर अधिक दराने विकली जात असल्याचेही तपासात आढळून आले आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन बुकिंग प्रणालीच्या सुरक्षेला अधिक बळकटी देण्यात आली असून संशयास्पद डिजिटल ओळखी आणि बुकिंग पद्धतींवर विशेष नजर ठेवली जात आहे. तिकीट बुकिंग प्रणाली अधिक पारदर्शक होईल आणि सामान्य प्रवाशांना कन्फर्म तिकीट मिळण्याची शक्यता वाढेल. सायबर गुन्हे पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारेही कारवाई तीव्र करण्यात आली आहे.

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

# ओएसएमवरून काँग्रेसचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) प्रणालीच्या अंमलबजावणीवरून काँग्रेसने केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सीबीएसईला अधिक खर्चिक ठरणारी ही प्रणाली स्वीकारण्यास का भाग पाडण्यात आले, याचे उत्तर केवळ शिक्षणमंत्रीच देऊ शकतात, असा दावा काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला.

जयराम रमेश यांनी सांगितले की, डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या बैठकीत सीबीएसईने स्वतःच ओएसएम प्रणालीचे आर्थिक परिणाम विद्यमान मूल्यांकन पद्धतीपेक्षा मोठ्या प्रमाणात अधिक असल्याचे नमूद केले होते. मात्र, त्यानंतरही ही प्रणाली राबविण्यात आल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

एका वृत्ताचा संदर्भ देत रमेश यांनी आरोप केला की, ओएसएम प्रणालीसाठीच्या निविदेचे मूल्य टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आले. सुरुवातीच्या दोन निविदांमध्ये कराराची रक्कम २८ कोटी रुपये होती. त्यानंतर ती ३८ कोटी रुपयांपर्यंत वाढली आणि अखेरीस जारी करण्यात आलेल्या कार्यादेशानुसार संबंधित संस्थेला ४६ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले. रमेश यांच्या मते, स्कॅन करण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रत्यक्ष संख्येच्या आधारे या कामाचे मूल्य सुमारे २५.३९ कोटी रुपये असायला हवे होते. त्यामुळे मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रत्यक्ष खर्चापेक्षा लक्षणीयरीत्या जास्त असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, संसदेच्या शिक्षणविषयक स्थायी समितीसमोर सीबीएसई अधिकाऱ्यांना खरेदी प्रक्रियेसंदर्भातील अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देता आली नसल्याचेही काँग्रेसने म्हटले आहे. १८ वर्षीय व्हिसलब्लोअर सार्थक सिद्धांत यांचे म्हणणे ऐकल्यानंतर समितीने या प्रकरणाची अधिक माहिती मागितली होती.

रमेश यांनी आरोप केला की, सीबीएसईला महागडी ओएसएम प्रणाली स्वीकारण्यास कशा परिस्थितीत भाग पाडण्यात आले, याबाबत स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

काँग्रेसने सरकारच्या अलीकडील कारवाईवरही टीका केली आहे. ओएसएम वादाच्या पार्श्वभूमीवर सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांना त्यांच्या पदांवरून हटविण्यात आले आहे. मात्र ही कारवाई केवळ जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवून या प्रकरणाची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## अभिषेक बॅनर्जींवरील हल्ला प्रकरणात नवे वळण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यावर दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील राजपूर-सोनारपूर येथे झालेल्या हल्ल्याप्रकरणी राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र झाले आहेत. तृणमूल काँग्रेसने हा हल्ला भाजप पुरस्कृत आणि पूर्वनियोजित असल्याचा आरोप केला असला, तरी या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सहा जणांपैकी एक जण तृणमूल काँग्रेसशी संबंधित असल्याचे समोर आले आहे.

३० मे रोजी राजपूर-सोनारपूर नगरपालिकेतील कामराबाद भागात अभिषेक बॅनर्जी एका मृत पक्षकार्यकर्त्याच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी गेले असताना त्यांच्या ताफ्यावर अंडी, चपला आणि दगड फेकण्यात आले. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. तृणमूल काँग्रेसने सामाजिक माध्यमांवर काही व्हिडिओ प्रसिद्ध करत हल्ल्यामागे भाजप कार्यकर्त्यांचा हात असल्याचा दावा केला आहे. घटनास्थळी भाजपचा एक पदाधिकारी सक्रियपणे उपस्थित असल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत अटक झालेल्या सहा जणांपैकी निर्माल्य सेनगुप्ता हे नाव विशेष चर्चेत आले आहे. सेनगुप्ता हे स्थानिक स्तरावरील प्रभावशाली तृणमूल नेते मानले जातात. त्यांचे निवासस्थान आणि तृणमूलच्या जय हिंद वाहिनीचे स्थानिक कार्यालय घटनास्थळापासून अवघ्या काही अंतरावर आहे. हल्ल्यानंतर ते सार्वजनिकरीत्या दिसले नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या इतर आरोपींची ओळख भाजप समर्थक म्हणून करण्यात आली आहे. त्यापैकी तपन मैती हे न्यायालयीन कार्यालयात कारकून म्हणून कार्यरत असून त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा घटनेशी संबंध नसल्याचा दावा केला आहे. केवळ अभिषेक बॅनर्जी यांच्या भेटीची माहिती मिळाल्याने ते घटनास्थळी गेले होते, असे त्यांच्या पत्नीने सांगितले. आकाश या २६ वर्षीय युवकाच्या कुटुंबीयांनीही आरोप फेटाळले आहेत. खेळाडू म्हणून ओळख असलेल्या आकाशचा हिंसाचाराशी संबंध नसल्याचा दावा त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

### पर्यटकांची कार दरीत कोसळली

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात शुक्रवारी एक कार सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळल्याने पंजाबमधील चार पर्यटक जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिक, पोलिस आणि बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. मिळालेल्या माहितीनुसार, डोंगराळ मार्गावरून प्रवास करत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याबाहेर जाऊन दरीत कोसळली. जखमी झालेल्या चौघांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## के. अन्नामलाईंचा राजीनामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत स्वतंत्र राजकीय चळवळ उभारण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे राज्यातील भाजपच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून आगामी राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नुकत्याच झालेल्या नवी दिल्ली दौऱ्यात अन्नामलाई यांनी भाजपचे राष्ट्रीय नेतृत्व, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली होती. या बैठकीत त्यांनी तामिळनाडूतील पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाबाबत काही चिंता व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याच्या चर्चांना वेग आला होता.

शुक्रवारी भाजपकडून त्यांच्या राजीनाम्याची अधिकृत पुष्टी करण्यात आली. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम मिळाला. अन्नामलाई यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधत आपल्या वाटचालीबाबत भूमिका स्पष्ट केली.

मी स्वतःच्या अटींवर पक्ष सोडला असून आता व्यापक जनसहभागावर आधारित नवी राजकीय चळवळ उभारण्याचा निर्णय घेतला आहे. ही चळवळ तळागाळातून उभी राहणारी, नव्या विचारसरणीची आणि व्यापक लोकसहभागावर आधारित असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## रामलिंगा रेड्डींचा राजीनामा, मुनियप्पांचीही उघड नाराजी

# कर्नाटक काँग्रेसमध्ये खातेवाटपावरून नाराजीनाट्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** नव्याने स्थापन झालेल्या डी. के. शिवकुमार सरकारमध्ये खातेवाटपावरून असंतोषाचे सूर उमटू लागले आहेत. ज्येष्ठ मंत्री रामलिंगा रेड्डी यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के. एच. मुनियप्पा यांनीही जाहीरपणे नाराजी व्यक्त केल्याने सरकारसमोरील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत.



राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी बेंगळुरू दौऱ्यावर आले असताना ही घडामोड घडली. माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि कर्नाटक प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष बी. के. हरिप्रसाद यांनी विमानतळावर त्यांचे स्वागत केले. यावेळी मंत्रिमंडळातील खातेवाटपावरून निर्माण झालेल्या नाराजीबाबत राहुल गांधी यांनी वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्याचे समजते.

बीटीएम लेआउट मतदारसंघाचे आमदार रामलिंगा रेड्डी यांनी त्यांना देण्यात आलेल्या जलसंपदा विभागाबाबत नाराजी व्यक्त करत मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांना बंगळुरू विकास खाते मिळण्याची अपेक्षा होती. मात्र हे खाते न मिळाल्याने त्यांनी आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडे सादर केला. जलसंपदा खाते कृष्णा बायरे गौडा यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. रेड्डी यांच्या राजीनाम्यानंतर के. एच. मुनियप्पा यांनीही अन्न व नागरी पुरवठा खात्याबाबत नाराजी व्यक्त केली. समाजकल्याण किंवा कृषी खाते देण्यात यावे, अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच उपमुख्यमंत्रिपदासाठी अनुसूचित जाती समाजातील प्रमुख दावेदारांपैकी ते एक मानले जात होते. मात्र हे पद जी. परमेश्वर यांच्याकडे गेले.

पत्रकारांशी संवाद साधताना मुनियप्पा यांनी खातेवाटपात ज्येष्ठतेचा योग्य सन्मान राखला गेला नसल्याची टीका केली. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सर्व नेत्यांना समान वागणूक देऊन ज्येष्ठतेचा आदर राखावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच राहुल गांधी यांनी खातेवाटपाचा फेरविचार करून जनतेच्या सेवेसाठी अधिक उपयुक्त विभाग सोपवावेत, अशी मागणी त्यांनी केली. पक्षाशी असलेली आपली पन्नास वर्षांची निष्ठा अधोरेखित करत मुनियप्पा यांनी आपण शिस्तबद्ध कार्यकर्ता असल्याचे सांगितले. खातेवाटपातील असमतोल दूर करण्याचीच आपली मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्यसभेच्या चार आणि विधान परिषदेच्या सात जागांसाठी १८ जून रोजी होणाऱ्या निवडणुकांनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार अपेक्षित आहे. सध्या रिक्त असलेल्या सुमारे २० जागा या विस्तारात भरल्या जाणार आहेत. त्यामुळे काही खात्यांमध्ये फेरबदल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

या पार्श्वभूमीवर डी. के. शिवकुमार यांनी रामलिंगा रेड्डी यांच्या नाराजीची दखल घेत त्यांच्या खात्यात बदल करण्याचे संकेत दिले आहेत. शहरी राजकारणातून आलेल्या रेड्डी यांना सिंचन खाते सांभाळणे सोयीचे वाटत नसल्याचे त्यांनी नमूद केले. रेड्डी हे पक्षातील महत्त्वाचे आणि जवळचे सहकारी असून त्यांची नाराजी दूर केली जाईल, असे शिवकुमार यांनी सांगितले.